शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मिरज
Government Medical College, Miraj
Miraj Pandharpur Road, Miraj, Dist.- Sangli - 416410.
▸ Website: gmcmiraj.edu.in ▸ Email: deangmcmiraj@yahoo.co.in ▸ Phone: 0233/2232090-99 ▸ Fax: 0233-2231959

जा.क्र.शावैममि/विवि/एच/दंत आवासी/ 1090 /२०२५ दिनांक :- 13 /०२/२०२५.

## "दंत आवासी" पदासाठी जाहिरात.

विषय : दिनांक:-०१/०३/२०२५ ते २८/०२/२०२६ या कालावधीसाठी दंतशल्यचिकित्साशास्त्र या विभागातील दंत आवासी हे पद भरणेबाबत...

**अर्ज स्विकारण्याचा अंतिम दिनांक :- २१/०२/२०२५ सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत**

दिनांक:-०१/०३/२०२५ ते २८/०२/२०२६ या कालावधीसाठी खाली निर्देशित केलेल्या दंत आवासी दंतचिकित्साशास्त्र विभाग या पदासाठी शासन निर्णय क्रमांक डिईडी/१५८३/१७६/एमईडी-१ दिनांक २२.११.१९८३ अन्वये पात्र असलेल्या उमेदवारांकडून विहित नमुन्यांतील अर्ज मागविण्यांत येत आहेत.

| अ.क्र. | पदनाम | एकूण पदे | कालावधी | आरक्षण |
|---|---|---|---|---|
| ०१ | दंत आवासी | ०१ | ०१/०३/२०२५ ते २८/०२/२०२६ | एकाकी पद असल्याने केवळ गुणवत्तेनुसार भरण्यात येईल. |

विहित नमुन्यांतील अर्जाचे शुल्क रु. २५०/- इतके आहे. मा.अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मिरज यांचे कार्यालयात अर्ज कामकाजाचे दिवशी कार्यालयीन वेळेत उपलब्ध होतील. संपूर्णतः योग्य रितीने भरलेले अर्ज त्यासोबतच्या आवश्यक अशा प्रमाणपत्रांच्या साक्षांकित सत्यप्रतींसह अधिष्ठाता यांचे कार्यालयात दिनांक १३/०२/२०२५ ते २१/०२/२०२५ रोजी सायंकाळी ०५=०० वाजेपर्यंत स्विकारले जातील.

विहित नमुन्यांत नसलेल्या अर्जाचा, अपुर्ण अर्जाचा, सहपत्रांशिवाय आलेल्या अर्जाचा, तसेच उशीरा आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. तसेच टपालाने अर्ज स्वीकारला जाणार नाही.

**शैक्षणिक पात्रता :-**

११)उमेदवाराने दंतवैद्यकशास्त्रातील अंतिम परिक्षा उत्तीर्ण झाल्यावर दोन वर्षाचे आंत अर्ज करणे आवश्यक आहे.
१२)उमेदवाराने कोठेही आवासी पदांवर अगर तत्सम कोणत्यांही पदावर तीन महिन्यांपेक्षा अधिक काम केले नसावे.
१३)उमेदवार डेंटिस्ट ॲक्ट १९४८ (एक्सव्हिआय-ऑफ १९४८) नुसार महाराष्ट्र राज्य दंतवैद्यक परिषदेकडील कायम नोंदणी प्रमाणपत्र धारक असावा.
१४)ज्या उमेदवाराचा आंतरवासिता कालावधी कोणत्याही कारणास्तव वाढला असेल त्याचा १ वर्षाचा आंतरवासिता कालावधी दिनांक २८/०२/२०२५ पर्यंत पूर्ण होणे आवश्यक आहे.
१५)शासकीय दंत महाविद्यालयातून उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना नियुक्तीसाठी प्रथम प्राधान्य देण्यांत येईल.

**आवश्यक प्रमाणपत्रे:-**

१९)प्रथम ते अंतिम दंतवैद्यक परिक्षेतील मिळालेल्या गुणपत्रिकेच्या तसेच पदवी प्रमाणपत्राच्या छायाप्रती.
२०)महाराष्ट्र दंतवैद्यक परिषदेकडील कायम नोंदणी प्रमाणपत्राची साक्षांकित छायांकित प्रत.
२१)जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र आवश्यक (मागासवर्गीय असल्यास)
२२)आवश्यक संवर्गासाठी नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्राची चालू वर्षाची छायांकित प्रत.
२३)प्रथम ते अंतिम दंतवैद्यक परिक्षेचे प्रयत्न प्रमाणपत्र
२४)आंतरवासिता प्रमाणपत्र
२५)वयाच्या दाखल्यासाठी एसएससी प्रमाणपत्र
२६)वय व अधिवास प्रमाणपत्र (Domicile/Nationality)
२७)आधार कार्ड

मुळ प्रमाणपत्र पडताळणी दिवस, वेळ व ठिकाण पुढीलप्रमाणे राहील :-

- गुरुवार दिनांक :- २८/०२/२०२५ रोजी,
- दुपारी ठिक ०१ =०० वाजतां,
  अधिष्ठाता यांचे कक्षात, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मिरज येथे

मुलाखतीचा दिवस, वेळ व ठिकाण पुढीलप्रमाणे राहील :-

- गुरुवार दिनांक :- २८/०२/२०२५ रोजी,
- दुपारी ठिक ०३=०० वाजतां,
- अधिष्ठाता यांचे कक्षात, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मिरज येथे.

विद्यावेतनः- दरमहा मुळवेतन ६६०० व त्यावरील सर्व भत्ते इतके एकत्रित विद्यावेतन अनुज्ञेय राहील.

अनामत रक्कम :-

निवड झालेल्या उमेदवाराना त्यांच्या एक महिन्याच्या विद्यावेतना इतकी अनामत रक्कम भरावी लागेल. अनामत रक्कम भरल्याशिवाय निवड झालेल्या उमेदवारांना कामावर रुजू होता येणार नाही.

सदर पदाच्या मुलाखतीसाठी अर्जदार इच्छुक उमेदवारांनी वर नमूद केलेल्या दिनांकास स्वखर्चाने मुलाखतीचे ठिकाणी वेळेपुर्वी हजर रहावे. त्यासाठी स्वतंत्र पत्रव्यवहार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी. सदरचे पद भरणे अथवा प्रलंबित ठेवणे तसेच जाहिरातीमधील बदल अथवा मुलाखती दिनांकातील बदलाबाबतचे सर्व अधिकार अधिष्ठाता यांनी राखून ठेवले आहेत. वेळोवेळी होणारे बदल महाविद्यालयांच्या www.gmcmiraj.edu.in संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येतील.

GOVT. MEDICAL COLLEGE MIRAJ

अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मिरज.

प्रति,

१७)मा.अधिष्ठाता, शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, मुंबई-४००००१
१८)मा.अधिष्ठाता, शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, औरंगाबाद-४३१००१
१९)अधिष्ठाता, नायर दंत महाविद्यालय व रुग्णालय, मुंबई-४००००८
२०)मा.अधिष्ठाता, शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर-४४००१९
२१)अधिष्ठाता, सर्व शासकीय वैद्यकीय महाविद्यालये
२२)प्राध्यापक व विभागप्रमुख, दंतशल्यचिकीत्साशास्त्र विभाग, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मिरज
२३)ग्रंथपाल, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मिरज
२४)कार्यालयीन सुचना फलक, अधिष्ठाता कार्यालय, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मिरज

प्रत : सविनय सादर

प्रत- मा. आयुक्त व मा.संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई-४००००१

प्रत- मा.सह संचालक, (दंत) वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई-४००००१